# मोहर

REFBK-0009390
REFBK-0009390

साहित्य-सहकार प्रकाशन
फर्गसन् महाविद्यालय

# ★ मोहर ★

ग्रंथ संग्रहालय,
क्रमांक
REFBK-0009390
किंमत ९/-

साहित्य-सहकार-प्रकाशन
फर्गसन् महाविद्यालय
पुणें ४.

## निवड-समिति

कवयित्री पद्‌मा गोळे

प्रा. वि. वि. पटवर्धन

प्रा. ग. प्र. प्रधान

## कार्यकारी-समिति

श्री. अर्जुन सस्ते

श्री. रतनलाल भंडारी

श्री. प्रभाकर परांजपे

श्री. भा. व. नेमाडे

श्री. बाळकृष्ण शाळीग्राम

कु. ललिता कोल्हटकर

कु. कुंदा कामत

## साहाय्यक

प्रा. रा. श्री. जोग

प्रा. श्री. रा. पारसनीस

मराठी काव्याच्या धमन्यातून

नवरक्त खेळविणाऱ्या

कवि **बा. सी. मर्ढेकर**

यांच्या उज्ज्वल स्मृतीस--

: प्रकाशक :

**श्री. अर्जुन परशुराम सस्ते**
( कार्यवाह-साहित्य सहकार, फर्गसन् महाविद्यालय )

: मुखपृष्ठ :

**श्री. प्रताप मुळीक**

: मुद्रक :

**श्री. गो. प. नेने**
राष्ट्रभाषा मुद्रणालय
३८७ नारायण, पुणें २

: प्रकाशन :

१०-२-१९५७

वि: ३।०५
९३५८३ नों: दि: २।२।३।५

# आधीं थोडेंसे—

रासिक मित्रहो,

ऋतुराजानं बाहेर सारी सृष्टि मोहरून टाकली असतांनाच, आमच्या 'सहकार' लाहि आज वासंतिक 'मोहर' फुलत आहे, हा अेक योगायोगच म्हणायचा !

१९३८ सालीं स्थापन झालेल्या आमच्या या 'साहित्य-सहकार' चा— कथा-कवितांचा संमिश्र असा अेक "अंकुर" त्याच वर्षी प्रकाशांत आला होता. अनेकांनीं आपल्या कृपादृष्टीचं खतपाणी घालून त्याला आजपर्यंत पोसलं. बाळसं टाकून 'सहकार' यौवनारूढ होईपर्यंत—म्हणजे आज त्याला १९ वर्षे पूर्ण होईपर्यंत— प्रा. रा. श्री. जोग आणि प्रा. श्री. रा. पारसनीस यांना त्यासाठीं खूप खस्ता खाव्या लागल्या आहेत. आणि म्हणूनच आज 'सहकार' १९५७ च्या क्रांतीचं नवं वारं लागतांच मोहरला आहे.

मराठी काव्याच्या धमन्यांतून नवरक्त खेळविणाऱ्या कै. कवि बा. सी. मर्ढेकर यांच्या उज्वल स्मृतीस, महाविद्यालयीन उदयोन्मुख कवींची एक काव्यांजालि अर्पण करावी; हा या 'मोहर' प्रकाशनांतील मुख्य हेतु आहे.

ही काव्यांजालि अर्पण करतांना ओंजळींतलं प्रत्येक काव्य-पुष्प निवडक नि वेंचक असावं यासाठीं, निवड-समितींतील कवयित्री सौ. पद्मा गोळे, प्रा. ग. प्र. प्रधान आणि प्रा. वि. वि. पटवर्धन यांनीं अगदीं कसोशीनं प्रयत्न केलेला आहे. त्याचप्रमाणें कवितांचीं मुद्रितं तपासण्याचं किचकट काम प्रा. रा. श्री. जोग यांनीं अत्यंत आस्थेनं आणि उत्तम केलं आहे, त्याबद्दल त्या सर्वांना—आमच्या भावना, प्रेम आणि कृतज्ञता यांखेरीज बहुमोल असं दुसरं काय देतां येईल !

काव्यसंग्रह प्रकाशित करायचा म्हणजे त्यासाठीं उत्तम कविता पाहिजेत, आणि त्या कविता चिठोऱ्यांवरून पुस्तकांत मुद्रित करण्यासाठीं "पैसा" हवा. पैशाशिवाय हे प्रकाशन होणं अशक्य होतं. पण सूचना-फलकांवर सूचना लागतांच, 'फर्गसन्, कॉमर्स' या महाविद्यालयांतील कवि-

कन्यका, नोटांच्या हिरव्या साडया नेसून सहकारकडें धांवत आल्या. आपल्या कविता व पैसा देऊन 'मोहर'च्या कविवर्गांनें सहकारला दुहेरी सहकार्य दिलेलं आहे. त्यावद्दल त्यांचं आणि हिरीरीनं काम करणाऱ्या कार्यकारी समितीचं करावं तितकं अभिनंदन थोडंच आहे.

तसंच, पांच-सहा दिवसांतच परन्तु अत्यंत चांगल्या तऱ्हेचं प्रकाशनाचं काम केल्याबद्दल श्री. ग. वा. करमरकर, श्री. मु. मा. जगताप, चित्रकार श्री. प्रताप मुळीक आणि वेळेवर ब्लॉक तयार करून दिलेली 'चित्रशाळा' या सर्वांचे आम्हीं फार फार आभारी आहोंत. सहकारला हातभार लावणारे आणखी कांहीं पडद्याआडचे मानकरी आहेत. त्यांत मुख्यतः श्री. वसंत शिंदे, श्री. प्रभाकर गायकवाड, आणि श्री. भिकाजी भोकरे, यांचा उल्लेख करणें अत्यावश्यक आहे.

शेवटीं रसिकांना अशी एक नम्र विनंती आहे कीं, त्यांनीं आमच्या या काव्य-संग्रहाकडं केवळ कौतुकाच्या नी सहानुभूतीच्या दृष्टीनें पाहूं नये. आम्हांला याची पूर्णपणें कल्पना आहे कीं, या आमच्या संग्रहांतील काव्याचा दर्जा महाराष्ट्रांतील थोर परंपरेला साजेसा नसेल; परन्तु तो त्या काव्यपरंपरेला निश्चितपणें बाधक होणार नाहीं, अशी खात्री वाटते. 'मोहर' मधील काव्याचा आत्मा स्वतंत्र, प्रामाणिक व उत्स्फूर्त भावनांच्या नर्तनानें भाराव-लेला आहे. संग्रहांतील बरीच कविता, तारुण्य-सुलभ अशा भावनांनींच मोहोरलेली दिसेल. अर्थात् तिच्या गुणदोषांचं मंथन करणं हें सर्वस्वी रसिक टीकाकारांच्या हातीं आहे. परंतु हा संग्रह त्यांच्या स्वाधीन करण्यापूर्वीं आमची भूमिका इतकींच कीं--

पांख फुटे पांखरूं । नुडे तरी नभींच स्थिरूं ।
गगन आक्रमीं सत्वरु । तो गरुडही तेथ ॥

—श्री अर्जुन सस्ते

—कु. ललिता कोल्हटकर

# निवेदन

साहित्य-सहकारचें हें दुसरें प्रकाशन सादर करण्यास आम्हांस फार आनंद होत आहे. ‘ सहकार ’ च्या जीवनास आज एकोणीस वर्षें पुरीं होत आहेत. संस्थांचें बाल्य केव्हां संपतें आणि त्यांचें प्रौढत्व केव्हां सुरू होतें हें सांगणें कठिण असलें, तरी त्यांच्या कार्यकारित्वाला अकाल कोणताच नसतो. ‘ सहकार ’ च्या या वर्षींच्या सभासदांत उत्साही कवींची संख्या बरीच असल्यानें आणि त्यांच्या उत्साहास योग्य दिशा मिळणें इष्ट वाटल्यानें एक लहानसा काव्य-संग्रह प्रकाशित करावा असें ब-याच विचारान्तीं ‘ सहकार ’नें ठरविलें व आज प्रकाशित होणारा ‘ मोहर ’ हा त्याचें मूर्त रूप होय.

‘ मोहर ’ मधील प्रत्येक मंजरी ही चांगली असावी या कल्पनेनें ‘ सहकार ’ नें एक निवडसमिति नेमली. या समितीचे सभासद म्हणून प्रसिद्ध कवयित्री सौ. पद्मावाई गोळे, प्रा. ग. प्र. प्रधान आणि प्रा. वि. वि. पटवर्धन यांनीं आलेल्या कवितांची मोठ्या कसोशीनें निवड केली, व मगच ‘ मोहर ’ मुद्रणाकरितां म्हणून मुद्रणालयाकडे पाठविण्यांत आला, आणि आज तो आपल्यापुढें ठेवण्यांत येत आहे.

‘ सहकार ’ च्या या दुसऱ्या प्रकाशनाला ‘ साहित्य–सहकार ’ चे एक भूतपूर्व सभासद आणि महाराष्ट्रांतील एक प्रथितयश साहित्यिक

श्री. पु. ल. देशपांडे हे उपस्थित आहेत ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. त्यांच्या चिकित्सक आणि अवखळ दृष्टीलाहि ' सहकार ' चें हें प्रकाशन आवडेल अशी आम्हांस आशा आहे. त्यांच्या शुभेच्छा ' सहकार ' ला उत्तेजन देतील व आणखी अधिक प्रयत्नास प्रेरक ठरतील.

' मोहर ' च्या सिद्धीला अनेकांचा हातभार लागला आहे. त्या सर्वांचे आभार मानणें येथें शक्य नाहीं. कांहीं उल्लेख अपरिहार्य आहेत. निवड-समितीच्या सदस्यांनीं मोठ्या आस्थेनें आणि उपलब्ध असलेल्या अल्प अवधींत आपलें काम पुरें करून दिलें याबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहों. तीच गोष्ट राष्ट्रभाषा-मुद्रणालयाची आहे. ' मोहर ' च्या मुखपृष्ठावरील सुंदर चित्र आपल्या कॉलेज्चे चित्रकार श्री. मुळीक यांचें आहे. त्यांचेहि आम्ही फार आभारी आहों. ' मोहर ' मधील मंजरी ज्यांनीं ज्यांनीं सादर केल्या, त्यांचे आभार प्रथमच मानणें योग्य असतांहि तें न करण्याचें कारण एवढेंच; कीं त्यांत ' सहकार 'नें स्वत:चेच आभार मानल्यासारखें होईल.

' सहकार ' ला अनेक ' मोहर ' पुढील कालांत येतील अशी आशा करणें योग्यच ठरणार नाहीं काय ?

रा. श्री. जोग
श्री. रा. पारसनीस
साहाय्यक

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १ | कवि मर्ढेकर | रतनलाल भंडारी | १ |
| २ | हवी तूं | गोपीनाथ मोरे | २ |
| ३ | कुंभ | माधव काळे | ३ |
| ४ | नशीब | ,, | ४ |
| ५ | टेंकडाचें हृद्गत | शिरीष केळकर | ५ |
| ६ | विजिगीषा | ,, | ६ |
| ७ | त्या माळावर | कु. कुंदा व. कामत | ७ |
| ८ | फत्तर | प्रभाकर परांजपे | ८ |
| ९ | उलटें-सुलटें | ,, | ९ |
| १० | नादहीन संगीत | भा. व. नेमाडे | १० |
| ११ | हीच ती जागा आहे ! | ,, | १२ |
| १२ | फिरत रहावी-तुझी धनुकली | ,, | १४ |
| १३ | नदीचा किनारा | अविनाश जोशी | १६ |
| १४ | रितें घरटें | अरुणकुमार आपटे | १७ |
| १५ | निरोप घेताना | ,, | १८ |
| १६ | बोंचणी | ,, | १९ |
| १७ | तुज जाणिव नाहीं | मधुकर दामले | २० |
| १८ | निःशब्दाच्या | नरेन्द्र बल्लाळ | २१ |
| १९ | निळ्या रुपेरी यावेळीं | ,, | २२ |
| २० | बदल | अं. दि. माडगूळकर | २३ |
| २१ | व्यथा | ,, | २५ |
| २२ | कविता माझी माझेवरतीं | मधुकर लिमये | २६ |

| | | | |
|---|---|---|---|
| २३ | ऊठ | मार्तंड नाचण | २८ |
| २४ | मैफल | रतनलाल भंडारी | ३० |
| २५ | उगा ओलांडली रेषा | अर्जुन सस्ते | ३२ |
| २६ | पुन्हां पुन्हां | कु. मीना दीक्षित | ३३ |
| २७ | सुखांतल्या सुखांतही | ,, | ३५ |
| २८ | येणारच तर | ,, | ३७ |
| २९ | अखेर | कु. पुष्पा कुकडे | ३९ |
| ३० | अपुरी पूजा | ,, | ४० |


★

ग्रंथ संग्रहालय,
२९६२५ वि: ३१०५
९३५३ नों: दि: १२।३।५५
वा. क्र. ९३९०

## कवि मर्ढेकर

छप्पन गाणीं लिहून गेले,
तदनंतर तव आली कविता;
ऋचे-ऋचेंतुन कढते नवता
मानवतेला पाहुनि द्रवतां.

विदूषकाची घेउनि मुद्रा,
घालवून जडतेची निद्रा;
पेटवून तें धड कीर्तीचें,
फोडिलेंस तूं बिंग नीतिचें !

बिलंदरा तूं महाबिलंदर,
तुझ्यांत होतें एक कलंदर;
त्यानें केलें अघटित कांहीं,
चैतन्याला कविता लेई.

द्रोणमूर्ति तव कविता झाली,
एकलव्य ते सारे आम्ही;
तुझ्या स्मृतीला वंदन करुनी
पुनश्च घुमवूं तुझीच वाणी !

—रतनलाल भंडारी

## हवी तूं

माझिया रक्ताचा,
कसा सांगूं वेग ?
मोजायाचें यंत्र
हृदय तुझें ग !

मनाची या उडी,
मोजण्या हवी तूं.
डोळ्यांच्या चेंडूचा,
झेल झेलण्या तूं.

दिशा प्रवासाची,
सांगण्या हवी तूं !
मला नाहीं ठावी;
वाटाड्याही हो तूं.

जीवनाची भाषा
कोणती, नी राग
नाहीं कांही ठावें.
मला तूंच सांग.

हवी तूं.....हवी तूं--
जिण्याच्या विश्वांत,
हवी तूं.....हवी तूं
मृत्यूच्या घरांत—!

—गोपीनाथ मोरे

## कुंभ

माझ्या मनाच्या कुंभांत
ओतलेंस जीवन तूं
आणि निघून गेलीस......

....पण अजूनहि
पाझरतो बघ वेडा
तुझी गार आठवण.

—माधव काळे

## नशीब

स्मृतीच्या कोषांत दडली होतीस तूं !
मनाशीं म्हटलें जपावा तो कोष
-नि जपलाहि...

अवचित आज फुंकरली किमया
अन् झालें तुझें फुलपांखरूं !

—आतां उरलंय् हातांत माझ्या
विसकटलेल्या धाग्यांचें एक रेशमी स्वप्न !

—माधव काळे

## टेंकाडाचें हृद्‌गत

" निवृत्त म्हातारे, येथें जमती
घटका–पाउण नित्य बैसती–
पृष्ठावरती;
सदा बोलती,
' जीवन जाहलें सारें अस्थिर,
कधीं सुटणार, जाणे ईश्वर !

तरुण-तरुणी इथेंच येती,
प्रेमाचे आलाप नित्य काढती;
मस्तक ऊरीं,
करहि करीं
गुंफूनि एकच नित्य सांगती,
' प्रीतीवीण कांहीं नसे जगतीं ! '

लहान मुलेंही येथें येतात,
धांपा टाकीत भंवती बघतात.
बघतांना दूर,
आश्चर्यीं चूर–
होऊनि नित्य तीं काय म्हणती,
' खिशांत मावेल दुनिया छोटी ! '

वृद्धांचीं, तरुणांचीं, मतें बालांचीं,
जगाविषयींचीं सारीं ऐकलीं–
जाणियेलें जरी असेन फत्तर
योग्य जन्म देई मज ईश्वर ! "

—शिरीष केळकर

## विजिगीषा

जिंकियले तूं
असाशिल सखये
पर्वत अन् नभ, भूतल वा जल;
नजर फेंकुनी,
हृदयें जिंकुनि
गुलाम बहुतां केले असशिल !

-परंतु तुजला
जिंकुनि घेइन
निश्चित -हा विश्वास असे मम;
दंवबिन्दूही
वांकवितो ना
तृणपातें जें तलवारीसम !

—शिरीष केळकर

## त्या माळावर

त्या माळावर—
लवलवणाऱ्या हिरवळल्या गवतांतून,
डोकावत होतीं
लालसर, पिवळट
रानफुलें.

त्या माळावर—
सळसळणाऱ्या पाचोळ्यांतून
खसखसत होतें
जीवजिवाणूं.

त्या माळावर—
फुलें ढाळत्या वृक्षाखालीं
वळलीं होतीं
माझीं पाऊलें.

अन् त्याच माळावर—
काव्यांतून माझ्या
पडला होता
माझ्या मनाचा
पहिला वहिला हुंकार!

—कु. कुंदा व. कामत

## फत्तर

वर्षामागुन वर्षें गेलीं;
आणि विचारिसि आतां प्रश्ना—
काळिज तुमचें दगडासम कां ?

—आठवतें पण ?
शब्दांचे त्वां दगड मारिले
नाजुक जागीं,
वर्षामागें !

— त्या दगडांनीं बांध फोडिले
आणि उसळला ज्वालामुखि वर;

होउन आतां थंड घट्ट तो
उरला नुसता काळा फत्तर !

—प्रभाकर परांजपे

## उलटें–सुलटें

व्यवहारामधिं पटलें होतें;
दुनिया सारी उलटी चाले.
जाणवलें पण आजच तसलें–
तुझेंहि वर्तन उलटें उलटें!

मनांत असुनी खूप बोलणें,
ओष्ठपाकळी तुझी न खुलते.
मनांत असुनी जवळीं येणें,
दूर दूर तूं होशी वेगें.

जगतामधलें उलटें वर्तन
विरघळतें, जणुं कडू औषधि.
—उलटयामधले भाव परी तव
सुलटे होउनि वेड लाविती!

—प्रभाकर परांजपे

## नादहीन संगीत

नव्यानें सुरू झालें आहे—आमचें जीवन;
हळूंहळूं आमच्यांत—ओळखी होत आहेत,
तरारलेलीं हृदयें—किलबिलत आहेत,
आमच्या लाजऱ्या......चोरट्या.....तरल नेत्रांतून
स्नेहाचे, प्रीतीचे धागे—विणले जात आहेत,

माझी पण एकाशीं—ओळख झाली आहे
माझ्याही सुखनिद्रेंत—फुलत आहेत स्वप्नें !
पुस्तकांतून, वह्यांतून एक चोरटी मूर्ति
डोकावून बघते आहे—मनांतल्या मनांत !

दोन डोळे आतां—लाजलेसे वाटतात मला;
दोन ओठ आतां—हंसलेसे वाटतात मला;
एक हृदय माझ्यापाशीं—येऊं पहात आहे
प्रीतीची मंद शीळ मला—धुंद करते आहे !

अनेक बेत आतां—मी रचतों आहे मनाशीं
ठरवितों आहे आणि—कांहींतरी मी स्वतःशीं
तिच्याशीं खूप बोलावेसें वाटतें आहे मला
कांहींतरी हळूंच—सांगणार आहे मी तिला.

—नाहीं ! परन्तु मी तिच्याशीं—बोलणार नाहीं;
हा अवीट लपण्डाव—संपविणार नाहीं.
किनाऱ्यावरचें हें—स्वर्गीय डुंबणें सोडून—
शांत…खोल… सागरांत जाणार नाहीं.
प्रीतीच्या साफल्यांत—छायेसारखी फिरेल ती—
तृप्ततेमधली मलूलता—मला नको आहे !

मुकेपणेंच हें गीत—गायचें आहे मला
नादहीन संगीतच—छेडायचें आहे मला !

—भा. व. नेमाडे

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
29445 वि. 05104
9363 नों दि. 22/3/54

## हीच ती जागा आहे !

हीच ती जागा आहे...
जिथें मीं...
तारुण्याच्या निळ्या निळ्या पेल्यांतून
प्रीतीचा पहिला घोट घेतला होता !

दृष्टीचें जाळें टाकून
ह्या इथेंच तूं उभा होतास,
अन् समोरून येतां येतां
माझें पाऊल अडखळलें होतें.

मनांतला गोंधळ लपवतां लपवतां—
चेहऱ्यावरचा गुलाबी गोंधळ
मला लपवतां आला नव्हता !

हीच ती जागा आहे, जिथें—
तुझ्या बुबुळांच्या गर्द वर्तुळांमधें
टसलेलें माझें जांभळें प्रतिबिंब
मी कितीतरी वेळ पहात राहिलें होतें !

अन् माझ्या ह्या ओठांचें कंपन..
—ह्या ओठांवरची हुरहुर—
तुझ्या थरथरत्या पांपण्यांनीं
तूं टिपून घेतलें होतेस !

माझ्या नकळत...मला कळावें म्हणून
अन् तुझ्याकडूनच...तुझ्याहि नकळत
हें सगळें...सगळें..झालें होतें!

अरे जादुगारा!
मला फसवतां फसवतां तूं—
स्वतःही फसला होतास!
ह्या इथेंच—
मला बेभान करतां करतां
तूं स्वतःचेंही भान विसरला होतास!

अरे! हीच ती जागा आहे—
जिथें मीं..
तारुण्याच्या निळ्या निळ्या पेल्यांतून
प्रीतीचा पहिला घोट घेतला होता!

—भा. व. नेमाडे

## फिरत रहावी—तुझी धनुकली

फिरत रहावी तुझी धनुकली
एकसारखी....तारांवरती
येत रहावी सतत मला नी--
तुझ्या सुरांतुन मृदूल गुंगी !

तंबोऱ्याच्या पार्श्वभूमिवर
वरती....वरती उडत रहावी
तुझ्या स्वरांचीं स्वैर पांखरें.
आणि वाटतें, फेकुन द्यावें-
माझें मन बेभान होउनी,
जागृतिच्या अन् निद्रेच्या मग—
सीमेवरती अनंत.....ओझल !

असें वाटतें स्वरसम्राटा !
सूर मारुनी गगनामध्यें
कांपत जावी, आवेगानें.....
निळसर त्याची असीम पोकळी
कांपत जावी कधीं न थांबत-
भासमान ती तलम निळाई
सूर मारित नि एकसारखा-
विरून जावें तिकडे कोठें !

उडी घ्यावि अन् उंचावरुनी-
सागरावरी अफाट....निळसर !
दाहि दिशांतिल गोल क्षितिजें-
जावि उचललीं भरभरा वर

डोके खुपसुन खालीं..खालीं....
सागरामधें....उन्मादानें..
तुडुंबल्या त्या जलविश्वाला
छेदत जावें; तळास शोधित—
आग उरींची शांत कराया
आग तरी ती वाढत जावी!
खोल..खोल...नी जातच जावें!!

तुझ्या उसळत्या संगीताचे
श्वेतपंख लावून थोरले
असेंच कांहीं..वाटावें मज;
विरून जावें माझ्यामधलें
जड...अचेत..रे...! असलें कांहीं
आणि उरावी माझ्यामध्यें
एक तरळती स्वप्निल गुंगी!

—भा. व. नेमाडे

## नदीचा किनारा

नदीचा किनारा, रात्रीची वेळ;
दशमीचा चांद, अंतरीं घालमेल;
आलें मी इथें, पाठमोरा तूं.

झालें मी उतावीळ डोळे तुझे झांकण्या
पावलांनीं चोरट्या सरकलें पुढें.
होतास तूं धुंद तुझ्याच गुंगींत
जाणिव ना माझी झाली तुला !
जाणिव नव्हती माझी तुला, अन्
थबकलें माझ्याच— संबोधना ऐकून
तुझ्या ओठांवर रेंगाळणाऱ्या !

पुटपुटलास तूं, "कुठ असशील ग ?"
आणि उत्तरलासही तूंच, आवेगानें,
खालीं बघत, "ह्या इथेंच...या बांसरीच्या अंतरीं"
अन् टेकलेस ओंठ, तुझ्या मुरलिमुखावर.
'राधेच्या' मुखाला, स्पर्शला 'कन्हय्या'!

प्रेमाचें संगीत, उफाळलें त्यांतून
थुइथुइ उडणारें, हृदय घेऊन
परतलें तिथुन, सांठवीत तुला
दृष्टीच्या चषकांत आकंठ आकंठ
धुंद निळ्या उत्कंठेनें !

—अविनाश जोशी

## रितें घरटें

नव्या अुगवत्या रविबिंबाची
कान्ती घेअुन लज्जालाली
दौडत आली तुझ्या कपोलीं,
अेकाअेकीं कोठें लपली....?

निळ्या जलाच्या दो डोहांमधिं
स्वप्नांकितशा; भावनोत्कटा
लहरि अुसळल्या, अुंच अुडाल्या;
अेकाअेकीं कोठें विरल्या.....?

शरदिन्दूच्या मृदु ज्योत्स्नेसम
मुग्धमधुरसें अर्थपूर्ण तें
मुखपटलावर हास्य झळकलें;
अेकाअेकीं कैसें पुसलें.....?

अंधुक दिसल्या अिन्द्रधनूच्या
त्या तुकड्यासम मनमोहक ते
तुझ्या मुखावर रंग सांडले.
अेकाअेकीं कैसे धुतले .. ... ?

मम हृदयाच्या — घरट्यामधला
मुग्ध बिचारा — जीव चिमुकला
अेकाअेकीं — कुठें अुडाला ... !

—अरुणकुमार आपटे

## निरोप घेतांना

आपल्या धूसर सहवासाचें
निळें धुकें विरलें होतें,
स्मृतींच्या लहरी शिवशिवत होत्या
तरीही माझ्या मनाला अजून.

निरोप घेतांना साऱ्यांचा
वळली माझी नजर चोरपावलानें;
तुझ्या तिरप्या नजरेला भिडून
प्रतिसादासारखी किंचित् खिळली.

तुझ्या काळ्या डोळयांच्या कडा
भिजल्याशा वाटल्या मला,
माझ्या हृदयवीणेच्या तारांवरून
हळूंच नाजूक बोटें फिरलीशीं वाटलीं मला.

तुझ्या थरथरत्या ओठांनीं
आणि खालीं वळल्या डोळयांच्या–
भिजलेल्या कडांनीं
मला भारून टाकलें होतें.

मी बावरून डोकावलों माझ्यांत
पण मी कुठें होतों तिथें--!
तुझीच प्रतिमा
हंसत होती माझ्यांत.

—अरूणकुमार आपटे

## बोंचणी

वर्षावाची,
गर्जणारी धो..धो...
रिमझिम
मंद झाली आतां !

पागोळीवर
सांठुन उरलें
गढूळ पाणी,
उगीच वाजे पिर पिर आतां !

बहर संपला
वासंतिक तो,
नव्या लतेवर
खुरट्या कलिका उगा उघडती आतां !

बिंब रवीचें
पूर्ण बुडालें,
रेंगाळलीं किरणें
लांब सांवल्यांशीं उगा खेळती आतां !

शर जखमेंतुन उपसुन गेला—
मात्र बोंचणी राही आतां !

—अरुणकुमार आपटे

## तुज जाणिव नाहीं

तुज ठाउक नाहीं
कुंतलांत तव ऊन सुनहरें
वाट चुके.

तुज माहित नाहीं–
पापण्यांत तव गुंतुनि पडलें
चिंब धुकें.

तुज पत्ता नाहीं–
गालांवर तव बालरवीचें
बिंब पिकें.

तुज जाणिव नाहीं–
वक्षावर तव तुडुंब घोटिव
मेघ झुके.

तुज जाणिव नाहीं–
निखळ अहेतुक विभ्रम तूझा
वेधुं शके
वेधुं शके
अन विंधुं शके ।

—मधुकर दामले

## निःशब्दाच्या

शब्दांची जइं सीमा सरली
बोलुं लागले नेत्रच अपसुक
निःशब्दाच्या उगमांतच त्या
जन्म पावलें कांहीं नाजुक !

—*नरेन्द्र बल्लाळ*

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८३८०
ग्रंथ : शाखा क्रमांक प्रत

## निळ्या रुपेरी यावेळीं—

रजनिराणिच्या माथ्यावरचा,
शुक्रतिलक लव ढळला आहे;
आभाळाला खळी मारुनी
चांद कधींचा हंसला आहे.

मालकंस केशरी सुनहरी
दूर कुठें दरवळतो आहे;
आठवणींचा मनीं पारवा
तालावर त्या घुमतो आहे.

निळ्या रुपेरी या वेळीं जें
मनांत ये, तें भलतें आहे;
तूं तेथें अन् हा येथें मी—
चुकतें आहे, सलतें आहे !

—नरेन्द्र बल्लाळ

बदल

इवलालं होतं रोप
मोरपंखावाणी पानं
कडूनिंबाचं रोपटं
आलं किती तरारुन.

धनी धारोष्ण दुधाचा
होतां बागडतां पाडा;
आला किती उभारुन
दोन वर्षांत रांगडा.

जुनेपणा पचवून
नव्यांतली पुन्हां नवी
मुग्ध धवल हास्याची
माजघरांत समई.

आली वयांत तुळस
हातीं कांकणं हिरवीं;
आळ्यांतच दामोदर
पति छायेंत वाढवी.

कुठें आहेस ग तूं
आश्रितांची या जननी
परदेशी पांखरांची
माझी मायाळू पक्षिणी.

किती कांपतो ग आई
हात तुझा पाठीवर ?
तुझ्या हंसऱ्या ओठांत
किती वृद्ध थरथर ?

कललेली तूं दुपार
शांत होतीस निर्मळ !
कशी झालीस माऊली
कांपरी ग सांजवेळ !

—अं. दि. माडगूळकर

## व्यथा

गुल्मोहर तो वठला आहे
ज्या खालीं मीं लिहिलीं होतीं
उन्मादांतिल पहिलीं गाणीं...

पडल्या पडल्या ज्याखालीं मज
प्रेमाआधीं सुचली होती
व्याकुळ भोळी एक विराणी...

ग्रीष्मामधल्या भर माध्यान्हीं
वागवीत जो डोळां खांदीं
नक्षिदार अन् नाजुक स्वप्नें..

बेफिकिरीचा पाढा पहिला
अन् धुंदीचा 'शिरीगणेशा'
दिधला ज्यानें खुल्या दिलानें..

गळ्यांत याच्या हात गुंफुनी
मी याला ना सांगत होतों
एक लाजरी मूक कहाणी...

नाहीं सरली अजुन कहाणी
तसाच झिम्मा झिमतो आहे
अर्ध्यावर परि साथ टाकुनी
गुल्मोहर तो वठला आहे !!
गुल्मोहर तो वठला आहे !!!

—अं. दि. माडगूळकर

## कविता माझी माझेवरतीं

स्वप्निं निघालों तुडवित रस्ते
कुठें तरी जे जातचि होते,
रस्ते असले कितिक बापुडे
सरळ वांकडे जाति चहुंकडे.

स्वच्छंदानें मन रमलेलें
विचार आतां करूं लागलें—
अवनि जरी ही गोल तरी रे
जीवन येथिल गोल नसे रे.

पुन्हां बालपण येइल का तें ?
जीवनांत फुलबाग-फुलवितें
बागेचें परि अतां पुष्प मी —
निर्माल्याचि राहिलों होउनी.

गुलाब मी त्या फुलबागेचा
पूर्णोन्मीलित रहावयाचा.
हाय ! पाकळी गळूं लागली
बालिशतेची छटा निमाली.

केव्हां आपण उमलुनि गेलों,
पूर्णत्वानें कसे बहरलों,
जाणवलें नच्च कांहीं तेव्हां
बहर येउनी गेला केव्हां !

तारुण्यांतीं काव्य उमगलें !
वार्धक्यीं तारुण्य उमजलें !

नाशिबीं अमुच्या सुयोग नव्हता-
जेव्हांचें तेव्हां कळण्याचा !

मद्देहाचा हा पाचोळा
होइल उडुनी जगावेगळा,
म्हणुनि पाहिलें मागें जेव्हां-
पुढचें पाउल कळलें तेव्हां !

क्षणिक थांबलों तेथें मीही
अंतर्मन मज वदलें कांहीं—
बा गेलेलें पुन्हां न मिळतें !
कधीं न मिळतें, कुणा न मिळतें !

तूं पृथ्वीचा जीवन-जन्तु
मानव जरि तूं-क्षुद्र परन्तु
ह्या अवनीवर पुढें जाउनि
येशिल जागेवरतीं फिरुनी.

पृथ्वी कारण गोल असे रे,
तो प्रगतीचा नसे मार्ग रे.
अतांचि त्याहुनि परतुनि मागें
भोग सौख्य हें—नसें वाउगें !

—मधुकर लिमयें

ऊठ ऽऽ

तुझ्या निद्रेच्या विश्वासू सोबतीनें मी आलों आहे.
ऊठ, पापण्या न उघडतां !
या पापण्यांचीच मला भीति वाटते ग.
त्यांच्या पिंजऱ्यांत मी सांपडलों होतों ना ? तेव्हांपासून.
म्हणून म्हणतों
जडावलेले डोळे तसेच मीट.
मीट म्हणतों ना ?
हं...असंच !!
आतां नीट पहा
आहे ना मी तोच..तेव्हांचाच ?
नकळत तुझे डोळे वळतात ना माझ्याकडे ?
अजूनही ती मदिरा आहे ग माझ्यांत;
अजून आहे ती जादू
आठवतं...!
तुझ्या कुंतलपाशांत माझें अंतर गुंतलें होतें.
वादळ–वाऱ्यासारखा मी घरीं आलों कीं,
तूंच ना रुसवा धरायचीस—गालफुगीचा.
पहा..
माझ्या तारुण्याची कळी अजून कोमजून गेलेली नाहीं
विचार-विचार ना तूंच त्या वृद्ध वडाला
ज्याच्या पारंब्याचा हिन्दोल करून मी आलों आहे.

अजून आपल्याला हंसणाऱ्या झुडपामागच्या सदाफुलीला विचार
आणि खरें सांगूं का ?
मला लवकर जायचें नाहीं.
पण तूं थांबणार ना ?
हिरव्या राईतल्या लाल नागमोडींत मी धांवायचा;
पण माझा हात धरून, आतां तूंच सारखी पुढें जात आहेस.
तुझ्या बिलवराच्या कंगोऱ्यावर मला अडखळवूं नकोस.
येऊं दे, येऊं दे ना ऽ ऽ ऽ मला.

—मार्तंड नाचण

प्रकाशाचीं फाटकीं तुटकीं वस्त्रें घेऊन
चार सांवल्या इथें हितगुज करतात.
जळालेले सुंभ आव्हान देतात विश्वाला;
फाटकीं मनें स्वप्नें ओकतात तांडवाचीं.

आठ डोळे.....आठ हात
हजार कथा....एक उपाय
तांडव....तांडव.....तांडव!
काळोखाची भक्कम भिंत
कापीत जातो डमरूचा नाद;
शिल्लक रहातो फक्त जीर्ण साद.

दुःखानें झिंगलेलीं मनें
लाखोली मोजतात समाजपुरुषाला
तयारी करतात ओंकारेश्वराची;
खप्पड गाल...कुजलेली चौकट
कोसळण्याची, निस्तेज होण्याची.

एक स्वप्न...दुसरें स्वप्न..हजार स्वप्नें
क्षितिजावर प्राची फुलण्यापूर्वींचीं
पहांटेचीं स्वप्नें..खरीं होणारीं स्वप्नें
रक्तांतून रंगणारीं...ज्वालेंतून उजळणारीं

कधीं मीही जातों
झिंगून जातों, फाटलेलें मन घेऊन जातों,

या मैफलींत बेहोष होतों;
रेशमी धाग्यांच्या पडद्याआडून
उद्यांच्या विश्वाला न्याहळून घेतों.

कुठें आहे ही मैफल?
मला विचारूं नका.
माझें नाक दाबण्याचा बावळट
प्रयत्न करूं नका.
सांभाळून पाऊल टाका;
माझ्या मुखांत जागृत ज्वालामुखी आहे!

इथल्या कथा ऐकायच्यात तुम्हांला?
इथें रंगदार लावणी नाचत नाहीं;
नेहमीं भैरवीचे सूर जळत असतात!

जरा बाजूला पहा-राखेच्या ढिगाखालीं
वाळलेल्या हाताच्या सामर्थ्यवान् मुठींत
तिची वाट आहे
कधींतरी जरूर पडेल,
तुमच्या हिताची गोष्ट आहे.
पण त्यासाठीं अग्निदिव्य करावें लागेल—
फाटून जाण्याचें, रक्त ओकण्याचें,
स्वतःचें मस्तक रणचंडीला अर्पण करण्याचें.
तरच तुमचे अंकुर
जळलेल्या कुरणांतून
कुजलेल्या चौकटीच्या थडग्यावर
बेहोषपणें फुलून येतील.

—-रतनलाल भंडारी

# उगा ओलांडली रेषा

उगा ओलांडली रेषा
आतां कशाला आक्रोश ?
हेम मृगाच्या रूपांत
होता लपला मारीच.

स्वर अडला मनांत
गीत घुमेना वनांत;
तम गोठण्यापूर्वींच
दिवा गेला हो विझून !

आतां घोर वाळवंटीं
मृगजळामागें धांव;
व्यथा लपविण्या आतां
नको नको होणें साव !

असें कसें झालें बाई !
कशी खळली तारका ?
देवदासाची दुनिया
जशी गेली ग जळून.

—अर्जुन सस्ते

## पुन्हा पुन्हां

पुसूनीयां पुन्हां पुन्हां
रेखाटावें चित्र एक.
उधळूनी पुन्हां पुन्हां
उभारावा साज एक...

तोडूनीयां पुन्हां पुन्हां
जुळवावी तार एक.
विरूनीयां पुन्हां पुन्हां
आळवावा राग एक...

मिटूनीयां पुन्हां पुन्हां
उमलावा भाव एक.
अंधारूनी पुन्हां पुन्हां
उजळावी उषा एक..

फिकटूनी पुन्हां पुन्हां
गडदावी स्मृति एक.
विसरूनी पुन्हां पुन्हां
आठवावें वेड एक....

सरूनीयां पुन्हां पुन्हां
उरावा तो स्वर एक.
ओघळूनी पुन्हां पुन्हां
तरंगावा अश्रु एक...

भंगूनीयां पुन्हां पुन्हां
रंगवावें स्वप्न एक.
मरूनीयां पुन्हां पुन्हां
जगावा तो क्षण एक!

—कु. मीना दीक्षित

## सुखांतल्या सुखांतही

सुखांतल्या सुखांतही
भारावतो जीव खुळा.
हृदयाला लागतात
सुखाच्याच तीव्र कळा...

हळव्या ह्या हृदयाला
सुखाचाच होतो भार,
नाजुकशा वल्लरीला
पेलवेना पुष्पभार..

सुखाच्या या आवेगांत
मन वेडें गुदमरे,
दहिंवरसिंचनानें
पाकळी ही थरथरे..

सुखाच्या ग कांचळीची
गांठ अशी आवळली,
सुखाच्या ग सावलींत
सुखाचीच मूर्च्छा आली...

गंधाच्या ग पुरामध्यें
बकुळीचा कोंदे ऊर,
शांत निळ्या अवकाशीं
आशंकांचें ये काहूर...

भरल्या ह्या सुखामध्यें
पापणी ही ओलावते,
कातर ही सांजवेळ
पश्चिमेला रेंगाळते...

कसलीशी मुग्ध छाया
उगीचच शहारते.
कसलीशी हुरहूर
उगीचच थरारते...

—कु. मीना दीक्षित

## येणारच तर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २९८२५ वि: ९१०५
क्रमांक ९३४३ नों: दि: २२/३/८०

येणारच तर,
येणारच तर
येउं नको तूं
चोरपावलीं चाहुल लपवित,
बेसावध अन् असतांना मी
    नको आवळूं पाश तुझे रे
    काळे कुरळे.

येणारच तर,
येणारच तर
दारांतुन ये.
उघड; उजळ माथ्यानें हांसत,
दारावरची वाजव अन् ती विद्युत्-घंटा.
देइन तुजला
उत्थापन; आसन,
करीन उत्कट हस्तांदोलन.
असातिल उघडे लोचन पाहत
सागर, लाटा, माड, किनारा
भरून राहिल नयनांमध्यें—
गगन निळें अन् धरती हिरवी.

आवर नंतर,
आवर नंतर काम आपुलें.

देउनि जा ही ठेव जयाची,
त्याच्या चरणीं करी समर्पण,
शत माझे
धन्यवाद रे
सांग तयाला.

अश्रू हंसतिल
रडेल हांसू
गळेल मग पाकळी पाकळी.
थांब जरासा एकच क्षण
वळुन पहा रे जातां जातां,
अखेरचा मग निरोप घेतां
करीन तुजवरती मी कविता.

—कु. मीना दीक्षित

## अखेर

झंकारली रे सतार
स्मरणांच्या तारांवरी;
हाय ! परी आतां हातीं
अखेरची एकतारी !

पूजा बांधिली तुझी रे,
माझ्या नेत्रींच्या दीपांनीं;
उधळोनी गेली आतां
चिता त्यांची पाजळोनी !

तुझ्या दर्शनाला आलें
ठुमरीची घेत साथ;
आतां मात्र परतलें
भैरवीस आळवीत !

तुजसवें उभविले
भव्य स्वप्नांचे इमले;
आतां सारे कोसळले
स्मशानांत मी उरलें !

—कु. पुष्पा कुकडे

## अपुरी पूजा

हृदयींच्या देव्हाऱ्यांत,
तेवतसे प्रेमज्योत.
तुझ्यासाठीं रे श्यामला,
गुंफीयली ' भाव-माला '.

दरवळे गाभाऱ्यांत
भावनांचा रे सुवासः
पूजेस्तव नयनांत
आसावली तुझी ' आस ! '

हृदयींचा श्याम परी भक्त-दर्शनाला गेला !
रुक्मिणीच्या गालावरी अश्रुबिंदु ओघळला !!

—कु. पुष्पा कुकडे

REFBK-0009390
REFBK-0009390
२३८८
ग्रंथ
२९५.२८ वि: ३८८४
९.३.८४ ता. २४.३.८४

# अनुपम प्रॉडक्टस्

## स्वच्छ चविष्ट व पौष्टिक

अनुपम मिठाईचीच मागणी करा.

श्रीखंड वडी, मिल्क टॉफी अमृतवडी, गोल्डन टॉफी, आलेपाक, आईस-क्रीम-लोलक, सुंठवडी, पेपरमिंट, काजुबर्फी, आंबावडी, इत्यादि उंची कन्फेक्शनरीचे कारखानदार.

**अनुपम प्रॉडक्टस्.**

५०९/२ सदाशिव पेठ, चिमण्यागणपती जवळ, पुणें २.

---

हिन्दी साहित्यकी छपाईमें अग्रसर

# राष्ट्रभाषा मुद्रणालय

३८७ नारायण पेठ, पूना २

*विशेषताएँ*

* आकर्षक और विविध टाईपोंसे समृद्ध * निर्दोष छपाई
* हिन्दी तथा अन्य भाषाओंमें अनुवाद करवा देनेकी याजना

---

**Always Visit**

*Nandakishor Cycles*

*Opp.* Fergusson **College**

* For best cycle repairs.

*Vaibhava Photo Studio*

* For out-door groups.
* And " Delight " Sugercane Juice

# Remember and Join

**(1) Kaluskar's Inter Arts Class**

in English Logic, Economics, World-History, Sanskrit and Ardhamagadhi.

**(2) Kaluskar's B. A. Class.**

( for B. A. Economics, ( Special ); B. A. General in Economics (Principles), Politics, Psychology and Ethics)

*Medium:–English as well Marathi.*

*Place:–Kaluskar's Class*

*Opposite Sambhaji Park Playground Gate, Poona.*

Purchase **Kaluskar's Poona-University Solutions** ( in English and Marathi ) of Logic, Economics, World History Papers.

| मीना लॉज | मे. जोशी आणि कंपनी |
|---|---|
| लॉजिंग–बोर्डिंग–रेस्टॉरंट | डेक्कन जिमखाना, पुणें ४ |
| टे. नं. ३१३२ | |
| * रम्य निवास | स्टेशनरी व जनरल मर्चन्ट |
| * सुग्रास भोजन | सर्व तऱ्हेची फाउन्टन पेन्स् |
| * चवदार पदार्थ | मिळतात |
| * माफक दर | व |
| डेक्कन जिमखाना, पुणें ४. | दुरुस्त केली जातात. |